**ओबीसी**

**अस्तित्वशुन्य भारतीय समुह**

जैमिनी कडु

**''कुणबी म्हणजे शेती करणारा. या कुणब्याने शेती व कौटूंबिक जीवन जगण्यासाठी गरजेनुसार निरनिराळे व्यवसाय केले. त्यातुन व्यावसायिक वर्ग निर्माण झाले. ज्या कुणब्याने लाकडाची अवजारे बनविली, तो सुतार, लोखंडाची अवजारे बनविली तो लोहार, बागायती शेती केली तो माळी, सोन्याचांदीचे दागिने बनविले, तो सोनार, चपला जोडे बनविले तो चांभार, घर ते ग्राम स्वच्छतेची कामे केली तो महार, गृहबांधणीची कामे केली तो बेलदार वगैरे. म्हणजे मुळ कुणबी असलेल्या व्यक्तीने कुटूंब व समुहाच्या भल्यासाठी जो जो व्यवसाय केला, तो तो त्याचा व्यावसायिक वर्ग झाला.''**

भारतातील हिंदु धर्मव्यवस्थेतील चार वर्गामध्ये समावेश असलेल्या चवथ्या वर्णातील शुद्र म्हणजे ओबीसी (इतर मागासवर्गीय जाती) शूद्र वर्ण असलेल्या भारतीय मानवी समुहास 'ओबीसी' ही सन्मानजनक संज्ञा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली निर्माण झालेल्या सर्वांगसुंदर अशा भारतीय संविधानामुळे मिळाली. भारतातील हिंदु धर्म व्यवस्थेत अस्पृश्यता ज्यांच्या वाट्यास आली तो वर्ग अतिशुद्र वर्ग होय. अर्थात ही अस्पृश्यता शूद्रासाठीही लागु होती. हिंदु धर्म व्यवस्थेमध्ये माणसाने माणसाला कनिष्ठ समजण्याची व्यवस्था इतकी भयानक व अभेद्य आहे की, तथागत गौतम बुद्धांपासुन तर अलिकडच्या नवख्या समाज सुधारकापर्यंत होत असलेल्या प्रयत्नांनाही पुरेसे यश आलेले नाही. या अस्पृश्यतेचे महाभयंकर वैशिष्ट्य असे की

ब्राम्हणातील उपजातींमध्ये ते आहेत. ब्राम्हणापेक्षा कनिष्ठ असलेल्या क्षत्रियांमधील उपजातींमध्ये ते विभागले आहेत. क्षत्रियांसाठी वैश्य अस्पृश्य. त्या वैश्यांच्या उपजातींमध्ये विभागले आहे. वैश्यांसाठी शुद्र अस्पृश्य. त्या शुद्रांच्याही उपजातीत विभागले आहेत. शूद्रांसाठी अतिशूद्र अस्पृश्य. त्या अतिशूद्रामध्येही विभागले आहे. अदिवासी व अल्पसंख्यांनाही या महाभयानक सामाजिक कर्करोगाने मोकळे सोडलेले नाही. या भयानक सामाजिक विषमतेची सामाजिक मानसिकता पद्धतशीरपणे निर्माण करण्यात आली आहे. तिला सुरक्षित ठेवण्यासाठी पौरानिक कथांच्या निर्मितीपासुन तर वाक्यप्रचारापर्यंत निर्मिती झाली आहे. उदा.'कुणबटं धसकटं म्हैस विकुन घेतली 'घोडी' (अर्थ- कुणब्याची बुद्धी म्हणजे गवताइतकी. दुध देणारी म्हैस विकुन ऐट दाखवण्यासाठी घोडी विकत घेतो.) कुणब्याने तेल्याचे तोंड पाहु नये. (दोन समुहामध्ये व्देष माजवण्यासाठी नळी फुंकली सोनारे- इकडुन तिकडे गेले वारे( म्हणजे सोनार इकडुन तिकडे जाणाऱ्या वाऱ्यासारखा चिल्लर.)

ओबीसीमध्ये परस्पराविषयी सामाजिक स्नेहभाव निर्माणच होणार नाही, याची दक्षता येथील हिंदु धर्मव्यवस्थेने केली आहे. त्यासाठी भाकडकथांची, तथाकथित धर्मग्रंथाची निर्मिती केली आहे.

भारताच्या एकुण लोकसंख्येमध्ये ओबीसींची लोकसंख्या सुमारे ६५ टक्के इतकी आहे. या ओबीसींसह सुमारे ९० टक्के लोकसंख्या असलेला भारतीय मानव समुह हा या भारतातील मूलनिवासी नागरीक आहे. मूलनिवासीच नाही तर या देशाचा मालक आहे. हा संपुर्ण मूलनिवासी (बहुजन या संज्ञेने ओळखला जाणारा ओबीसी- दलित-आदिवासी- अल्यसंख्यांक) मूळचा कुणबी आहे. कुणबी म्हणजे शेती करणारा. या कुणब्याने शेती व कौटूंबिक जीवन जगण्यासाठी निरनिराळे व्यवसाय केले. त्यातुन व्यावसायिक वर्ग निर्माण झाले. ज्या कुणब्याने लाकडाची अवजारे बनविली तो सुतार, लोखंडाची अवजारे बनविली तो लोहार, बागायती शेती केली तो माळी, सोन्याचांदीचे दागिने बनविले तो सोनार, चपला जोडे बनविले तो चांभार, घर ते ग्राम स्वच्छतेची कामे केली तो महार, गृहबांधणीची कामे केली तो बेलदत्त वगैरे म्हणजे मूळामध्ये कुणबी असलेल्या व्यक्तीने कुटूंब व समुहाच्या भल्यासाठी जो जो व्यवसाय केला, तो तो त्याचा व्यावसायिक वर्ग झाला. हा मूळचा कुणबी व्यावसायीक वर्गातील कमी अधिक आर्थिक फायद्यामुळे कमी अधिक प्रमाणात गरीब श्रीमंत राहिला. पण त्यात जातिभेद वा परस्पर व्देषाची टोकाची भावना कधीच नव्हती. किंबहुना श्रममुल्याचे महत्व इतके कधीच अत्युच्य प्रतीचे होते की त्यामुळे परस्पराविषयी अधिक सामाजिक आत्मियता होती. काळ परिवर्तनीय असल्याचे सतत बदलत गेला. बदलत्या काळानुसार मूळात कुणबी असलेल्या व्यावसायिक वर्गात कमी अधिक प्रमाणात विकास होत राहिला. तथापि स्वामित्वाची भावना स्पर्धेत बदलती नसल्याने या संपुर्ण मूलनिवासी भारतीयांमध्ये मानवतेचे सामाजिक संबंध कायम होते.

हा सारा शेती व शेतीपुरक व्यवस्थेशी जुळलेला मूलनिवासी भारतीय मुलतः सिंधु नदीच्या खोऱ्यातील रहिवासी. वेगवेगळ्या गणांमध्ये सामावलेल्या. हळु हळु तो साऱ्या भारतभर पसरला. पुढे स्थायिक झाला. तेथील भौगोलिक वातावरणाचा प्रभाव पडल्याने त्यांच्या नैसर्गिक रंगापासुन तर वेषभूषा, भाषेपर्यंत बदल झाले. तथापि मूळ (इंडिजिनस) सामाजिक मानसिकता एकजीवी राहिली. भारतीय बहुजनांची दैवते, सण, उत्सव, यांचे सामाजिक विश्लेषण केले असता त्यांच्यातील नैसर्गिक साम्य उघडकीस येते. मूलनिवासी भारती सिंधु जनांमध्ये (बहुजनांमध्ये) जात नावाचा प्रकार नव्हता. धर्म संस्था उदयास आलेली नव्हती. शेती व शेतीपुरक व्यवसाय ही सांघीक स्वरुपाची कामे असल्याने परस्पर सहकार्य, सामंजस्य, सहचर्य, सद्‌भावना, सामाजिकता उल्लेखनीय होती. (धर्मांध व सत्तांध राजकारण गावागावात पोहोचण्यापुर्वी काल परवापर्यंत असेच सामाजिक वातावरण होते. धर्मांधानी व सत्ताधांनी ते सडवले) त्यामुळे जातीच्या नावावर निर्माण झालेली श्रेष्ठ-कनिष्ठता नव्हती. त्यातुन निर्माण होणारी व्देशभावना नव्हती.

आता जगातील उपलब्ध जन्म घेतलेल्या व्यक्तीला कसे मिळतात? तेही तपासुन पाहणे अत्यावश्यक आहे. एखादया धर्मातील आईच्या पोटी जन्म घेतली की वडीलांचा धर्म अधिकृतपणे त्या पाल्यास लाभत नाही. धर्म धारण करण्याचा संस्कार प्रत्येक धर्मामध्ये सांगितला आहे. उदा. इस्लाममध्ये सुंथा हा संस्कार, ख्रिस्तीमध्ये बाप्तिस्मा हा संस्कार, पारशामध्येही बाप्तिस्मा, शिख-जैन-धर्मामध्ये दीक्षा, त्याचप्रमाणे वैदिक धर्मामधअये उपनयन (मुंज) हा संस्कार सांगितला आहे. इतर धर्मामध्ये संस्कार करवुन घेवुन तो धर्म कुणालाही प्राप्त होऊ शकतो. परंतु वैदिक (हिंदु) धर्मामध्ये तशी व्यवस्था नाही. उपलब्ध वैदिक (हिंदु) धर्मग्रंथानुसार उपनयन संस्कार करुन घेण्याचा अधिकार केवळ ब्राम्हण वर्गालाच आहे. म्हणजे संस्कार करवुन घेत हिंदु होण्याचा धार्मिक अधिकार क्षत्रिय,वैश्य, व शूद्रास नाही. भारतातील हिंदु धर्मीय नेत्यांच्या वक्तव्यानुसार आता भारतात दोनच वर्ग शिल्लक आहेत. एक ब्राम्हण व दुसरा शूद्र आणइ धर्मशास्त्रानुसार शूद्रांना उपनयन संस्कार करवुन घेण्याचा अधि्कार नाही. म्हणजे तो हिंदु होवू शकत नाही. याचा स्पष्ट अर्थ असा आहे की भारतातील ८५ टक्के ओबीसी, आदिवासी, व दलित यांचा कोणता असा धर्मच नाही. डॉ.आंबेडकर यांनी धम्मदीक्षा दिलेले बौद्ध याला अपवाद आहेत. ही सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट धार्मिकस्थिती असल्यामुळेच ओबीसीमधील एका मोठ्या समुहाने 'शिवधर्म' स्थापन करुन दीक्षा घेण्याचे घोषित केले आहे.

भारतातील ओबीसींमधील वाचन, संशोधनाचे प्रमाण अत्यल्प आहे. जे ओबीसी विश्वविद्यालयातुन पदव्या घेऊन बाहेर पडतात. ते शिक्षणाचा संबंध डोक्याशी जोडण्याविषयी पोटाशी जोडतात. परिणामी नोकरी लागताच हे ओबीसी नोकरदार बनुन नवब्राम्हण होण्यासाठी धडपडतात. पदवीधर ओबीसींची बौद्धिक व मानसिक गुलामगिरी इतकी भयानक आहे, की त्यांना धर्मचिकित्सा, जात-चिकित्सा वगैरे प्रकार सहनही होत नाहीत. नोकरदार ओबीसी हे ब्राम्हणवादाच्या दहशतीखाली जगतात. तर बेरोजगार ओबीसी हे राजकीय पक्ष व नेत्यांचे लांगुन चालन करण्यात धन्यता मानतात. काही इतके चंगळवादी झाले आहेत की परिवर्तन हा शब्द उच्चारला तरी झळ पोहचुन नुकसान होईल, अशी भिती वाटते. ओबीसीमधील शिक्षित उच्चशिक्षित वर्गच जर स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्यासाठी तयार नसेल तर कष्टाळु ओबीसींबद्दल काय बोलावे! दुदैव तर असे आहे की विश्वविद्यालयातुन पदव्या घेऊन बाहेर पडणारा ओबीसी सर्वाधिक अंधश्रद्धाळु, भेकड, चंगळवादी, मानसिक गुलाम बनला आहे बनत आहे. ओबीसींना विषेशत: पदवीधर व नोकरदार ओबीसींना त्यांचे समाजसुधारक परिवर्तनवादी विचारांचे महापुरुष महत्वाचे वा पूजनीय वाटत नाहीत. भ्रम निर्माण करणारे, दैववादात गुंतवणारे अन् वारंवार एकच अतार्किक - अवैज्ञानिक -निराधार- खोटी सांगुन ब्रेनवॉशिंग करणारे बाबा-बापु-संत -महंत-साधु महत्वाचे वाटतात. अलिकडच्या काळात हा ओबीसी मानसिकदृष्ट्या इतका नपुसंक झालेला दिसुन येत आहे की, दैववादात गुंतवणाऱ्याकडुन भरदिवसा तो वाईटरित्या लुटला जात आहे. राजकीय नेते तर फारच वाईट उपयोग करुन घेत आहेत. ओबीसीच्या या

मानसिक नपुंसकतेचा फायदा भारतातील ब्राम्हणवाद्यांना व पुंजीवाद्यांना इतका मिळत आहे की श्रीमंत अधिक श्रीमंत व गरीब अधिक गरीब होत चालला आहे.

ओबीसींची ही मानसिक गुलामगिरी जोपर्यंत संपत नाही तोपर्यंत बुद्ध, फुले, शाहु, आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, गुणाजी माळी, शामरावजी पेजे, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे इत्यादी महामानवांना अभिप्रेत असलेली मूलनिवासी भारतीयांची व्यवस्था प्रस्थापित होणार नाही. राजमाता जिजाबाईचा प्रत्येक शब्द शिरसावंद्य मानून ज्या छत्रपती शिवरायांनी बहुजनांची व्यवस्था, बहुजनांचे स्वराज्य स्थापन करण्याचा यशस्वी प्रयोग केला, त्यांचेही स्वप्न साकारणार नाही. महत्वाचे म्हणजे ओबीसींना आपली मानसिकता बदलवली नाही तर ओबीसींना भवितव्यच नाही. मुक्त अर्थव्यवस्थेच्या पार्श्वभुमीवर विचार केला तर येत्या दशकात या ओबीसींचे कुत्र्यासारखे हाल होतील. ओबीसींना आपल्यासह आपल्या मुलाबाळांचे सुखी-समाधानी भवितव्य घडवायचे असेल तर आधी स्वतःचा सांस्कृतीक इतिहास समजुन घ्यावा लागेल. आपल्या महापुरुषांचे विचार व त्या मागील त्यांची भावना समजावुन घ्यावी लागेल. विज्ञानवादी व बुद्धीप्रामाण्यवादी व्हावे लागेल. ब्राम्हणवादी व पुंजीवादाची व्यवस्था ही आपल्या हिताची नाही हे समजावुन घेत संघटीत व्हावे लागेल. स्वतःचे सर्व प्रकारचे अस्तित्व निर्माण करावेच लागेल. त्यासाठी सांस्कृतीक पुराव्यांवर विश्वास ठेवत गैरसमज, मतभेद कायमचे गाडुन टाकावे लागतील. समाज जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्वतःचे प्रभावी अस्तित्व निर्माण करावे लागेल. आजच्या अस्तित्वशून्येतूनच बाहेर पडुन आक्रमक हेच अस्मिता व्यवस्था निर्मितीसाठी कटीबद्ध व्हावे लागेल.

**-जैमिनी कडु**